# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 08 January 2026

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष सकल देशांतर्गत उत्पादन सात पूर्णांक चार टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज
- महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला वेग, काही ठिकाणी पक्षांतर्गत वाद
- भाजप-काँग्रेस आघाडीवरून दोन्ही पक्षांत नाराजी; अंबरनाथची काँग्रेस कमिटी बरखास्त; तर अकोट इथं एमआयएमशी युतीबाबत भाजपची संबंधितांना नोटीस

आणि

- मराठवाड्यासह विदर्भात किमान तापमानात घट

****

चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष सकल देशांतर्गत उत्पादन सात पूर्णांक चार टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. गेल्या आर्थिक वर्षात हा दर साडे सहा टक्के असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रातल्या वाढीमुळे आर्थिक वृद्धीदर सात टक्क्यांच्या पलीकडे जाऊ शकतो असं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला असून, प्रचारात आघाडी घेण्यासाठी स्थानिक पातळीवर कार्यकर्ते तसंच पदाधिकाऱ्यांची चढाओढ सुरू आहे. यामुळे प्रचारात रंगत येत आहे.

मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल लातूरमध्ये जाहीर सभा घेतली. लातूरला आधुनिक शहरासाठी आवश्यक नागरी सुविधा देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. राज्याच्या जडण घडणीत माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांनी दिलेलं योगदान अमूल्य असून, आपल्याला त्यांच्याविषयी नितांत आदर असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. देशमुख यांच्याबद्दलच्या भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या विधानाचा विपर्यास झाल्याचा दावा त्यांनी केला.
दरम्यान, चव्हाण यांच्या या वक्तव्याच्या निषेधार्थ लातूरनजिक बाभुळगाव इथं काल बंद पाळण्यात आला. तर लातूर इथला प्रस्तावित बंद, आमदार अमित देशमुख यांच्या आवाहनानंतर मागे घेण्यात आला.
राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार काल पुण्यात शिवाजीनगर, कसबा, कोथरुड, पर्वती परिसरात रोड शो च्या माध्यमातून प्रचार केला.
पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपने जाहीरनामा प्रसिद्ध केला, तर कोल्हापुरात काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी प्रसिद्ध केला.

**

दरम्यान, प्रचारादरम्यान काही ठिकाणी पक्षांतर्गत वाद उफाळून येत असल्याचंही दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगर इथं माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्या प्रचार फेरीदरम्यान त्यांच्या वाहनावर काही युवकांनी हल्ला केला. काल दुपारी घडलेल्या या घटनेबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**

छत्रपती संभाजीनगर इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. मयूर सोनवणे यांचं कार्यालय जाळण्याचा प्रयत्न समोर आला आहे. काल पहाटे साडे चार वाजेच्या सुमारास घडलेला हा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला. याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**

जालना जिल्ह्यातल्या एका आमदाराच्या भावाने छत्रपती संभाजीनगर इथं एकावर चाकू हल्ला करून त्याच्या चारचाकीची तोडफोड केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली, मात्र काही वेळातच आरोपी ठाण्यातून पसार झाल्याचं वृत्त आहे. श्यामसुंदर उढाण असं या आरोपीचं नाव आहे.

****

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये निवडणूक झाल्यानंतर भाजपच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी एमआयएम आणि काँग्रेसबरोबर स्थानिक पातळीवर समझोता केल्याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. यात सहभागी झालेल्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ नगरपरिषदेत शिवसेनेला डावलून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर अंबरनाथ विकास आघाडी भाजपनं तयार केली, तसंच अकोला जिल्ह्यात अकोट इथं एमआयएम बरोबर समझोता केला आहे. हे समझोते खपवून घेणार नाही असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. अकोट इथं एमआयएमसोबत युती प्रकरणी भाजपने आमदार प्रकाश भारसाखळे यांना नोटीस बजावली आहे.

**

स्थानिक पक्षांसोबत आघाडीचा भाजपाच्या नेत्यांचा हा निर्णय चुकीचा असल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली. ते नाशिक इथं प्रचार रॅलीनंतर वार्ताहरांशी बोलत होते.

**

दरम्यान, काँग्रेसनं अंबरनाथ इथं ब्लॉक कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यासह पक्षाच्या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केलं आहे. भाजपसोबत युती केल्याप्रकरणी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. ही युती चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचं काँग्रेसनं या बाबतच्या पत्रात म्हटलं आहे.

****

काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचं काल पहाटे अकोला इथं उपचारादरम्यान निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. पटेल यांच्यावर अकोल्यातील मोहाळा या गावी चाकू हल्ला झाला होता. या प्रकरणी उबेद पटेल या तरूणाला पोलिसांनी अटक केली.

****

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात काल २६ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं, यामध्ये सात महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. छत्तीसगडच्या पुनर्वसन योजनेअंतर्गत या सर्वांनी पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करल्याचं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. या नक्षलवाद्यांवर एकूण ६४ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

****

राज्यातल्या २४ साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जाचा उपयोग इतर कामांसाठी केल्याचं आढळून आलं आहे. राज्यातल्या एकूण ३० कारखान्यांना महामंडळानं चार हजार ३५५ कोटी रुपयांच्या कर्जांचं वाटप केलं होतं, या कारखान्यांनी कर्जाचा वापर कशासाठी केला याची पाहणी जून आणि जुलै महिन्यात करण्यात आली, त्यात २१ साखर कारखान्यांनी कर्ज वाटपाच्या नियमांचं गंभीर उल्लंघन केल्याचं तर तीन कारखान्यांनी काही प्रमाणात उल्लंघन केल्याचं निदर्शनास आलं. या कारखान्यांवर पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य सरकारनं साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या प्रकरणी तपासणी करुन कारवाईची शिफारस करण्यासाठी समितीला दोन आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे.

****

केंद्र सरकारनं नुकत्याच पारित केलेल्या विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण – व्ही बी जी राम जी या योजनेत रोजगार निर्मितीबरोबरच ग्रामीण उपजिविका सक्षम करण्यावर भर दिला जाणार असल्याचं बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितलं. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासन स्तरावर तयारी सुरू करण्यात आली असल्याची माहिती शेळके यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – चंद्रकांत शेळके**

****

महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपाच्या प्रचारगीताला निवडणूक आयोगानं परवानगी नाकारली आहे. या गीतात 'भगवा' या शब्दाचा उपयोग करण्यात आला होता. धार्मिक प्रतिकांच्या राजकीय प्रचारात वापरास आचारसंहितेनुसार बंदी आहे, त्यामुळे हा शब्दप्रयोग नियमांच्या विरोधात असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांसाठी आज प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं आहे. दोन सत्रांमध्ये हे प्रशिक्षण दिलं जाणार आहे. यापूर्वीच्या प्रशिक्षणाला हजर न राहिलेल्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणात सहभागी होऊन संभाव्य कारवाई टाळावी, असं आवाहन मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी जी श्रीकांत यांनी केलं आहे.

****

जालना महानगरपालिका क्षेत्रात परवानाधारकांकडे असलेली शस्त्रं निवडणूक काळात परत मागवण्यात आली आहेत. आचारसंहिता लागू झाल्यापासून ते आतापर्यंत एकूण २४५ पैकी २१४ शस्त्रे, परवानाधारकांनी विविध पोलिस ठाण्यात जमा केली आहे. ही शस्त्रे त्यांना निवडणूक संपल्यानंतर परत मिळणार असल्याचं, मनपा कार्यालयाकडून कळवण्यात आलं आहे.

****

जनगणना २०२७ पूर्वतयारी प्रशिक्षण कार्यशाळेत जनगणना कामासाठी अचूक माहिती संकलनासाठी योग्य नियोजन करण्याचे निर्देश परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सर्व नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिले आहेत. या कार्यशाळेत ते काल बोलत होते. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात येणार असून, अचूक विश्वासार्ह लोकसंख्या आकडेवारी मिळवण्यासाठी मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे जनगणना प्रक्रियेतली प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक समजून घेऊन अमंलबजावणी करण्याची सूचना जिल्हाधिकारी चव्हाण यांनी केली.

****

बीड इथले कवी अनिलकुमार होळकर यांच्या `भुरळ डोळ्यांची` या चित्रपटाने पश्चिम बंगाल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट कथालेखक तसंच सर्वोत्कृष्ट गीतकार हे पुरस्कार पटकावले आहेत. प्रभातकुमार फिल्मस् निर्मित या चित्रपटाला याआधी आंतरराष्ट्रीय पातळीवरचा सर्वोत्कृष्ट गीत लेखन पुरस्कार प्राप्त झाला आहे. अखिल भारतीय मराठी चित्रपट निर्माता महामंडळाच्या फिल्म फेस्टिवल २०२५ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला.

****

राज्य लोकसेवा आयोगाची गट क संयुक्त पूर्व परीक्षा येत्या रविवारी होणार आहे. बीड जिल्ह्यातल्या बारा केंद्रातून सकाळी ११ ते १२ यावेळेत ही परीक्षा घेण्यात येणार असून, दोन हजार ८५० उमेदवार ही परीक्षा देणार आहेत.

****

राज्यात विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट तर मराठवाड्यात किंचित घट झाली आहे. काल गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी साडे सात अंश तर नागपुरात आठ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. अहिल्यानगर साडे नऊ, जळगाव, नांदेड तसंच परभणी इथं सुमारे साडे दहा तर छत्रपती संभाजीनगर इथं साडे अकरा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****